जा.क्र. सा.नप/संगणक/04/ 5920230000 297
सातारा नगरपरिषद, सातारा.
दिनांक :- 05/10/2023

## सातारा नगरपरिषद सातारा

## <u>मालमत्ता कराबाबत जाहीर आवाहन</u>

सध्या सातारा नगरपरिषदेमार्फत नव्याने हद्दवाढ झालेल्या भागासह शहरातील सर्व मिळकतधारकांना एकत्रित मालमत्ता कराची बिले देणे सुरु केले आहे. सातारा नगरपरिषदेची दिनांक 07 सप्टेंबर 2020 रोजी हद्दवाढ झाली. महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 106 नुसार हद्दवाढ झालेनंतर त्या भागासाठी प्रथम वर्षी म्हणजेच 2021-22 या आर्थिक वर्षी कर आकारणी करण्यात आली नसून त्यानंतरचे आर्थिक वर्ष 2022-23 ला मालमत्ता कराच्या 20% व आर्थिक वर्ष 2023-24 ला मालमत्ता कराच्या 40% अशाप्रकारे जुन्या दरानेच दोन वर्षाची कर आकारणी हद्दवाढ भागासाठी केली आहे सातारा नगरपरिषद हददीत नव्याने समाविष्ट झालेल्या भागांना यानुसार बिले देणेत आली आहेत.

नगरपरिषदेने नवीन करवाढीच्या अनुषंगाने चतुर्थ वार्षीक पहाणीनंतर महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 119 नुसार मागील वर्षी नोटिसा बजावल्या होत्या.त्यानंतर सुनावणी आयोजीत केली होती तथापि नगरविकास विभागाकडील पत्र क्र. व्हिआयपी-2022/प्र.क्र.990/नवि-18 दिनांक 06/02/2023 नुसार नवीन दराने कर आकारणीस तात्पुरती स्थगिती दिली असून जुन्या सध्या अस्तित्वात असणाऱ्या दराने कर वसूली साठी स्थगिती देण्यात आलेली नाही.


शासनाने दिलेली स्थगिती मागे घेतल्यानंतरच विहीत हरकती सुनावणीची प्रक्रिया पूर्ण होऊनच नवीन दराची कर आकारणी लागू होणार आहे. सध्या एकत्रित मालमत्ता कराच्या बिलामधील नमूद शासन शिक्षण कर व रोजगारहमी कर हे कर नगरपरिषद शासनाच्या वतीने जमा करुन शासनास भरणा करते. नागरिकांनी भरलेल्या कर उत्पन्नातूनच रस्ते, पथदिवे सोयीसुविधा पुरविता येणार आहेत.

यावर्षी प्रथमच नगरपरिषदेने QR कोड असणारी बिले वाटप केली असून नागरिकांना कर भरणा करणेसाठी नगरपरिषद कार्यालयात यायला लागणार नसून नागरिकांना घरबसल्या मिळकत कर भरणा मोबाईल व्दारेच अथवा ऑनलाईन <u>www.property.sataranp.in</u> या वेबसाईटवरून करता येणार आहे. नजीकच्या काळात नागरिकांना मोबाईल ॲप उपलब्ध करुन देण्यात येणार असून नागरिकांना इतर सुविधा देखील मोबाईल ॲप मध्ये देण्यात येणार आहेत. ज्या नागरिकांना कार्यालयात येऊन कर भरणा करावयाचा झालेस नगरपरिषद परिषदेचे मुख्य कार्यालय, तसेच शाहुपूरी कार्यालय,सदरबझार ,गोडोली , विलासपूर इ. क्षेत्रीय कार्यालयाच्या ठिकाणी समक्ष करभरणा करु शकता. विहीत कालवधी मध्ये कर भरणा केल्यास बिलातील नमूद 1% सूट मिळवता येणार आहे नागरिकांनी विहीत कालावधीत कर भरणा न केलेस अधिनियामतील कलम 150 (अ) नुसार दरमहा 2% शास्ती देयक रकमेवर लागते. त्यामुळे वेळेवर कराचा भरणा करून शास्ती अनुज्ञेय होणार नाही याची नागरिकांनी दक्षता घ्यावी. तरी सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, आपले बिल भरणा घरबसल्या ऑनलाईन <u>www.property.sataranp.in</u> या वेबसाईटवरून किंवा खालील पध्दतीने करा व बिलातील नमूद सुट मिळवा. ऑनलाईन मिळकत कर भरणा करणेची प्रक्रिया खालीलप्रमाणे.

→ बिलावरील उजव्या बाजूस अशा प्रकारचा QR Code असेल तो स्कॅन करा.

➢ PAY TAX ONLINE WITH PAYMENT GATEWAY → ओपन झालेल्या पेज वरुन PAY TAX ONLINE WITH PAYMENT GATEWAY या बटनावर वर क्लिक करा.

➢ Amount : 0.00 → येथे भरणार ती रक्कम नमूद करा.




- त्यानंतर VERIFY AND PAY येथे क्लिक करा.
- यातील कोणताही एक पर्याय निवडा व त्याची आवश्यक ती माहिती भरा.
- या बटनावर क्लिक करून आपले पेमेंट पूर्ण करा आणि पावती च्या पेज ला रिडायरेक्ट होईपर्यंत वाट पहा.
- तयार झालेली पावती PRINT बटनावर क्लिक करून PDF स्वरुपात सेव करून घ्या.

झालेली पावती पुन्हा पहावयाची असलेस त्याच पेजवर view Demand वर क्लिक करून संगणकीकृत मालमत्ता क्रमांक टाकून Get Details वर क्लिक करा व पेजच्या खाली पावती नंबरवर क्लिक करून पावती पहा.

(अभिजीत बापट)
मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद सातारा